# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 12 October 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १२ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- विजयादशमी निमित्त सर्वत्र उत्साह–ठिकठिकाणच्या देवीमंदिरांमध्ये घटोत्थापनेनं नवरात्राची सांगता.
- ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन.
- प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेच्या पोर्टलवर ९१ हजार आंतरवासिता संधी उपलब्ध.

आणि

- भारत–न्यूझीलंड दरम्यान येत्या १६ ऑक्टोबरपासून तीन कसोटी क्रिकेट सामन्यांची मालिका.

****

विजयादशमीचा सण आज सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे. मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यात माहूर इथं रेणुकादेवी मंदिर, धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथं तुळजाभवानी मंदिर, बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथं योगेश्वरी देवी मंदिर, जालना जिल्ह्यात अंबड मत्स्योदरी देवी मंदिर आणि छत्रपती संभाजीनगर इथं कर्णपुरा परिसरातल्या तुळजाभवानी मंदिरात घटोत्थापना होऊन नवरात्राची सांगता झाली. नागरिकांनी सायंकाळच्या सुमारास सीमोल्लंघनानंतर दर्शनासाठी मंदिरांमधून गर्दी केली आहे.

घरोघरी आज दसऱ्यानिमित्त सरस्वती पूजन, शस्त्रपूजन, वाहनपूजन आदी सोहळे पार पडले.

साडे तीन शुभमुहूर्तांपैकी एक असलेल्या आजच्या दिवशी घरखरेदी, वाहनखरेदी तसंच आभुषण खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी केल्याचं दिसून आलं.

विजयादशमीचा सण हा अन्यायावर न्यायाचा विजय मिळवणारा तसंच सत्य आणि सदाचार या मूल्यावर विश्वास वाढवणारा सण आहे, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशातल्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

दसऱ्यानिमित्त राज्यभरात विविध मान्यवरांनी मेळाव्यांना संबोधित केलं.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघांच्या ९९ व्या स्थापना दिनानिमित्त आज सकाळी नागपूर इथं विजयादशमीच्या मुख्य कार्यक्रमाला सरसंघचालक डॉ मोहन भागवत यांनी संबोधित केलं. इस्रो अर्थात भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष के. राधाकृष्णन मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'तंत्रज्ञानानं शैक्षणिक संस्थांमध्ये बदल घडवून आणला आहे. नवं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारताला एका समृद्ध अशा ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतरित करेल', असा विश्वास डॉ राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केला. रेशीमबाग मैदानावर देशभरातून आलेल्या स्वयंसेवकांच्या पथसंचालनानं या कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी मोहन भागवत यांच्या हस्ते शस्त्रपूजन करण्यात आलं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांसह अन्य मान्यवर तसंच संघस्वयंसेवक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर इथं पंचवीस ठिकाणी सकाळी संघ स्वयंसेवकांनी शिस्तबद्धरीत्या पथसंचलन करून सर्वांचे लक्ष वेधून घेतलं. परिसरातल्या महिलांनी संचलन मार्गांवर सडा, रांगोळी काढून पुष्पवृष्टी केली, संचलन पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा भाजपच्या राष्ट्रीय सचिव आमदारा पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी केली आहे. संत भगवान बाबांची जन्मभूमी असलेल्या बीड जिल्ह्यात पाटोदा तालुक्यातल्या सावरगाव इथं झालेल्या दसरा मेळाव्यात त्या बोलत होत्या. राज्यातल्या अठरापगड जाती धर्मांच्या जनतेला सोबत घेणार असल्याचं सांगत, त्यांनी सर्वांना एकत्र येण्याचं आवाहन केलं. कृषीमंत्री धनंजय मुंडे यावेळी उपस्थित होते, संघर्षाच्या काळात आपण सर्वांनी एकत्र येऊन वज्रमूठ बांधण्याचं आवाहन त्यांनी केलं.

****

बीड जिल्ह्यातल्या शिरूर कासार तालुक्यातल्या नारायणगड इथं झालेल्या दसरा मेळाव्यात मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी समाज बांधवांना संबोधित

केलं. नारायण गडाने कधीच जातीची शिकवण दिली नसून कायम समतेचा संदेश दिला असल्याचं जरांगे पाटील यांनी सांगितलं.

****

शिवसेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांचे दसरा मेळावे आज मुंबईत होत आहेत. आझाद मैदानावर होणाऱ्या मेळाव्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर शिवाजी पार्क मध्ये होणाऱ्या मेळाव्याला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे संबोधित करतील.

****

परभणी शहरातील श्री शिवप्रतिष्ठान आणि विश्व हिंदू परिषदेच्या वतीनं विजयादशमीनिमित्त आज भव्य महादौड काढण्यात आली. शहरातील मुख्य भागातून शिवाजी महाराज पुतळा, नारायण चाळ, क्रांती चौक या मार्गे गेलेल्या या महादौडचा क्रीडा संकुलात सामूहिक महाआरतीनं समारोप झाला. परभणी शहरातली ही सुमारे ४५ वर्षांची परंपरा आहे. राष्ट्रीय स्वंसेवक संघाच्या वतीनंही आज शहरात पथसंचलन करण्यात आलं.

****

६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आज साजरा होत आहे. नागपूर इथं दीक्षाभूमीवर भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत सामुहिक बुद्धवंदना झाली. यावेळी समता सैनिक दलाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना देऊन अभिवादन केलं. दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा होत आहे. यासाठी देशभरातून बौद्धअनुयायी नागपूर इथं दाखल झाले आहेत. महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून अनुयायांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

धम्मचक्र प्रवर्तना दिनाच्या निमित्याने छत्रपती संभाजीनगर इथं बुद्ध लेणीच्या पायथ्याशी असलेल्या परिसरामध्ये बौद्ध अनुयायांनी मोठी गर्दी केली आहे. मुख्य कार्यक्रम संध्याकाळी पार पडणार आहे

****

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या शिर्डी इथं साईबाबांचा १०६ वा पुण्यतिथी सोहळा साजरा होत आहे. आजच्या विजया दशमीच्या दिवशी साईबाबांनी देहत्याग केला होता. कालपासून विविध धार्मिक विधी आणि श्रीसाई सच्चरित्र पारायणाला सुरूवात

झाली असून आज उत्सवाचा मुख्य दिवस आहे. हा सोहळा तीन दिवस चालणार आहे. दरम्यान, साईबाबांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त मंदिर आणि परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई तसच फुलांची सजावट करण्यात आली आहे.

****

अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सुलभा खोडके यांना काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आलं आहे. पक्ष विरोधी कारवाया केल्याने प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या निर्देशावरून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ही कारवाई केली.

****

प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेच्या पोर्टलवर आतापर्यंत १९३ कंपन्यांनी ९१ हजार इंटर्नशिप म्हणजेच आंतरवासिता संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. हे पोर्टल आजपासून अर्जदारांसाठी खुलं झालं असून अर्जदार २५ ऑक्टोबरपर्यंत आपले अर्ज सादर करू शकतात. कंपन्या त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आंतरवासिता संधीबाबत या पोर्टलवर माहिती देणार असून यामध्ये तेल, वायू, उर्जा, पर्यटन यासारख्या विविध २४ क्षेत्रांचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ या काळात २१ ते २४ वर्षे वयोगटातल्या सव्वा लाख जणांना आंतरवासिता संधी मिळवून देण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. आंतरवासिता उमेदवाराला एका वर्षासाठी दरमहा ५ हजार रुपये तर एक रकमी अनुदान म्हणून ६ हजार रुपये दिले जाणार आहेत.

****

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित-महाप्रितनं राज्यात परवडणारी घरं, सौरऊर्जा आणि कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातील बदलाचं नेतृत्व करावं, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

महाप्रीत संचालक मंडळाची २५ वी बैठक मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत झाली. त्यावेळी ते बोलत होते.  राज्यात होणाऱ्या विविध प्रकल्पांची कामं जलद आणि दर्जेदार करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले.

****

माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या वर्षीही सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयं, शासकीय संस्था, मंडळे, सार्वजनिक उपक्रम कार्यालयांनी

विविध उपक्रमांचं आयोजन करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. प्रसारमाध्यमांच्या कार्यालयात देखील वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात यावा, असं आवाहन मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. नामदेव भोसले यांनी केलं आहे.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला येत्या १६ ऑक्टोबरपासून सुरूवात होत आहे. या कसोटी सामन्यासाठी नुकतीच भारतीय संघाची घोषणा करण्यात आली. या मालिकेसाठी रोहित शर्मा कर्णधार तर जसप्रीत बुमराह उपकर्णधारपदाची धुरा सांभाळणार आहे.

दरम्यान, भारत आणि बांगलादेश यांच्यातला तिसरा आणि शेवटचा टी-२० क्रिकेट सामना आज हैदराबाद इथं संध्याकळी ७ वाजता सुरु होणार आहे. भारतीय संघ या मालिकेत दोन-शून्य असा आघाडीवर आहे.

आयसीसी महिला टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज न्यूझीलंड विरुद्ध श्रीलंका संघात सामना होत आहे. प्रथम फलंदाजी करत श्रीलंका संघाने निर्धारित २० षटकात ५ खेळाडूंच्या मोबदल्यात ११५ धावा केल्या आहेत.

****

नांदेड जिल्ह्यात अर्धापूर तालुक्यातल्या पारडी शिवारात आज स्थानिक गुन्हे शाखेने चौघांकडून दोन गावठी पिस्तूल आणि चार जिवंत काडतूस जप्त केले. या कारवाईत पोलिसांनी एका चार चाकी वाहनासह एकूण ३ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे, अशी माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी दिली.

****

धुळे इथं आज शहरातील विविध १०१ विकास कामांचं आमदार फारुक शाह यांच्या हस्ते एकाच वेळी भव्य उद्घाटन करण्यात आलं. ५ वर्षाच्या आमदारकीच्या काळात आपण धुळे शहरातील प्रत्येक घटकाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी प्रामाणिकपणे काम केलं, असं शाह म्हणाले. विविध सामाजिक संघटनांच्या वतीने आमदार शाह यांचा यावेळी नागरी सत्कार करण्यात आला.

****

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने कर थकबाकीदार मालमत्ताधारकांसाठी विजया दशमी निमित्त विशेष सुट जाहीर केली आहे. आजपासून म्हजेच १२ ते १५ ऑक्टोबर या कालावधिक मालमत्ता धारकांनी आपल्याकडील थकबाकी रक्कम एकरकमी भरल्यास त्यावरच्या व्याजावर ७५ टक्के सुट देण्यात येणार आहे. या योजनेचा मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा, असं अवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केलं आहे.

****

जालना शहरातल्या अंबड चौफुली भागातून अवैधरित्या गुटख्याची वाहतूक करणारा एक ट्रक तालुका पोलिसांनी आज पकडला. या ट्रकमध्ये राज्यात विक्रीस बंद असलेला ५५ लाख ७५ हजार रुपये किमतीचा गुटखा आढळून आला. या प्रकरणी पोलिसांनी ट्रक चालकास ताब्यात घेतलं असून, त्याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक सुरेश उणवने यांनी दिली.

****

आज जागतिक संधिवात दिन आहे. हाडांच्या आजारांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, एम्स इथल्या संधिवातशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉक्टर उमा कुमार यांनी संधिवात ओळखून त्यावर योग्य उपचार करणं आवश्यक असल्याचं म्हटलं आहे. समाजमाध्यमं आणि ऐकीव माहीतीवरुन रुग्णांनी स्वतःहून उपचार घेऊ नये, असं त्या आकाशवाणीशी बोलताना म्हणाल्या.

****